निरीक्षक प्रमाणित शाळा व तत्सम पदे, गट-ब चाळणी परीक्षा-१८

# A

दिनांक-२३.डिसेंबर, 2018

→ संच क्रमांक

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

O12

प्रश्नपुस्तिका
चाळणी परीक्षा

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. 2018 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे युवकांना प्रेरित करणारे कोणते पुस्तक प्रकाशित झाले?

(1) सोशियल हार्मोनी (Social Harmony) (2) इंडियाज् सिंगापुर स्टोरी (India's Singapur Story)

(3) मन की बात (Mann Ki Baat) (4) एक्झाम वरीअर्स (Exam Warriors)

---

2. 2018 च्या बडोदा येथील अखिल भारतीय मराठी संमेलनाचे अध्यक्ष खालीलपैकी कोण आहेत?

(1) लक्ष्मीकांत देशमुख (2) डॉ. अक्षयकुमार काळे

(3) डॉ. श्रीपाल सबनीस (4) डॉ. सदानंद मोरे

---

3. 15 व्या वित्त आयोगाच्या अध्यक्षपदी खालीलपैकी कोणाची नेमणूक करण्यात आली?

(1) सी. रंगराजन (2) डॉ. वाय.व्ही. रेड्डी (3) डॉ. विजय केळकर (4) एन.के. सिंग

---

4. भारतातील पहिली तरंगती बाजारपेठ कोणत्या शहरात उभारली आहे?

(1) मुंबई (2) दिल्ली (3) कोलकाता (4) चेन्नई

---

5. पाच वेळा जागतिक विजेतेपद प्राप्त करणाऱ्या मेरी कॉमने, 2018 च्या कॉमनवेल्थ खेळातील बॉक्सिंग स्पर्धेत कोणत्या महिला वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले?

(1) 35 ते 38 किलो (2) 25 ते 28 किलो (3) 45 ते 48 किलो (4) 55 ते 58 किलो

---

6. एका सांकेतिक भाषेत 'BOY' ला 'ACNPXZ' असे लिहितात. तर त्याच सांकेतिक भाषेत 'GIRL' ला कसे लिहिता येईल?

(1) FHJHQSKM (2) FHHJQSKM (3) FHHJSQKM (4) FHHQJSKM

---

7. खालील चौकटीत रिकाम्या जागी योग्य अक्षर भरा.


| | | |
|---|---|---|
| S | P | L |
| O | K | F |
| U | P | - |





(1) I (2) J (3) K (4) L

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

8. दिलेल्या आकृत्यांच्या मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या जागेसाठी जास्तीत जास्त तर्कसंगत पर्याय निवडा.



(1)  (2)  (3)  (4) 

---

9. दिलेल्या अक्षर समूह मालिकेत प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी क्रमाने येणारे पद दिलेल्या पर्यायांमधून निवडा.
GPW, GPUW, GIPUW, GIPSUW, __?__
(1) GIHPSUW (2) GIPQSUW (3) GIKPSUW (4) GIJPSUV

---

10. जर CLASS = 12; COLLEGE = 16, तर TEACHERS = ?
(1) 15 (2) 16 (3) 17 (4) 18

---

11. राजला एक काम पूर्ण करण्यास 24 दिवस लागतात तेच काम कमल 12 दिवसांत पूर्ण करतो. जर दोघांनी एकत्र काम केले तर ते किती दिवसांत पूर्ण होईल?
(1) 12 दिवस (2) 36 दिवस (3) 18 दिवस (4) 8 दिवस

---

12. जर एका संख्येचा 56% म्हणजे 1064 तर त्या संख्येचा 38% किती?
(1) 666 (2) 722 (3) 856 (4) 912

---

13. किंमत काढा :

$$\frac{2.3\times2.3-2.1\times2.1}{4.4}=?$$

(1) 0.1 (2) 0.2 (3) 0.3 (4) 0.4

---

14. द.सा.द.शे. 10 रुपये दराने 100 रुपये मुदलाचे दोन वर्षात चक्रवाढ व्याज किती?
(1) 10 रुपये (2) 21 रुपये (3) 20 रुपये (4) 22 रुपये

---

15. एका शाळेत एकूण 968 विद्यार्थी आहेत. त्यांना रांगेत उभे रहाण्यास सांगितले. प्रत्येक रांगेत जेवढी मुले आहेत त्याच्या निमपट रांगांची संख्या आहे. तर प्रत्येक रांगेत किती विद्यार्थी असतील?
(1) 22 (2) 44 (3) 66 (4) 48

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 16 ते 19 ची उत्तरे द्या :**

संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल-विशिष्ट रीत म्हणजे संस्कृति, अशी सुरुवातीस व्याख्या केली तर ती कळणे कठीण जाईल; कारण परत 'संस्कार' शब्दाची फोड नीटपणे केली पाहिजे. सध्या सुरुवातीची व्याख्या म्हणून ही चालेल. ह्यातील 'संस्कार' कशाला म्हणायचे ते पाहूं.

पृथ्वीवरील सर्व वस्तूंवर संस्कार घडत असतात. सर्व वस्तु एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया करीत असतात. पावसाने दगड झिजतो, माती भिजते, बीज अंकुरतें. उन्हानें दगड फुटतात, बीज वाढीस लागतें, पिकतें व वाळतें. दगडावर दगड आपटतो. फुटतो, नदीच्या प्रवाहानें वाहत जाऊन त्याचे गोटे होतात. पृथ्वीवर व पृथ्वीवरील वस्तूंवर प्रत्यहीं असे संस्कार होत असतात. पृथ्वीचें व पदार्थांचे रूप ह्या संस्कारांमुळें सारखें पालटत असतें. पण आज ज्या संस्कारांचा आपणांस विचार करावयाचा आहे ते हे नव्हेत. ही सदैव पालटणारी पृथ्वी मनुष्याच्या संस्कारित जीवनाची पार्श्वभूमी आहे.

हजारों वर्षे चालून चालून माणसांच्या पायाने मंदिराच्या पायऱ्या झिजतात. रस्त्यावर गाड्या जाऊन जाऊन रस्त्यावर चाकोऱ्या पडतात; पण दगडावर व रस्त्यावर हे जे संस्कार घडतात ते त्यांच्या स्वत:च्या संस्कारित जीवनामुळे नव्हे. हे संस्कार मानवी जीवनाच्या साक्षी आहेत. नांगरलेलीं शेतें, पूल बांधलेले प्रवाह, धरणानें अडवलेले जलाशय, हे पृथ्वीवर घडलेले संस्कार मानवांच्या संस्कारित जीवनाचीं प्रत्यक्ष प्रमाणें आहेत. जड वस्तूला स्वत:चे संस्कारमय जीवन नाही; पण प्राण्यांना तसें असतें का?

पक्षी थंडीवाऱ्यापासून पिलांचें संरक्षण करण्यास घरटीं बांधतात. पिलांना चारा भरवतात, त्यांना संगोपितात, त्यांना उडणें, भक्ष्य शोधणें वगैरे महत्त्वाचें शिक्षण थोड्याबहुत प्रमाणांत देतात. कित्येक पक्षी दरवर्षी त्याच त्याच ठिकाणीं येऊन घरटीं बांधतात. कांहींमध्यें नरमादीचें जोडपे जन्माच्या गांठीनें बांधलेलें असते. घरटीं मोठीं सुबक असतात. पक्षी संघ करून राहतात.

---

**16.** पुढीलपैकी कुणाला संस्कारमय जीवन नसते?

(अ) दगड (ब) पृथ्वी (क) प्राणी (ड) माणूस

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (क) व (ड) बरोबर
(3) फक्त (ब) बरोबर
(4) फक्त (अ), (ब), (क) बरोबर

---

**17.** संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे :

(अ) समाज (ब) समाजव्यवस्था (क) संस्कृति

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (ब) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) (अ), (ब), (क) तिन्हीही चूक

---

**18.** सदैव पालटणारी पृथ्वी मनुष्याच्या कोणत्या जीवनाची पार्श्वभूमी आहे?

(1) सामाजिक जीवनाची
(2) संस्कारित जीवनाची
(3) धार्मिक जीवनाची
(4) पारंपरिक जीवनाची

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

19. संस्कार कशाची साक्ष देतात ?

(1) अनेक पिढ्यांची
(2) सामाजिक मूल्यांची
(3) मानवी जीवनाची
(4) असामाजिक घटकांची

**Read the given passage and answer Q. No. 20 to Q. No. 23 based on it.**

I had never seen a house on fire before, so, one evening when I heard fire engines with loud alarm bells rushing past my house, I quickly ran out and, a few streets away, joined a large crowd of people; but we could see the fire only from a distance because the police would not allow any one near the building on fire.

What a terrible scene I saw that day! Huge flames of fire were coming out of each floor, and black and thick smoke spread all round. Every now and then tongues of fire would shoot up almost sky-high, sending huge sparks of fire round - about.

Three fire engines were busily engaged and the firemen in their dark uniform were playing the hose on various parts of the building. The rushing water from several hoses soaked the building but it did not seem to have any effect on the flames. Then the tall red ladders of the fire engine were stretched upwards and I could see some firemen climbing up with hoses in their hands. On reaching almost the top of the ladder, they began to pour floods of water on the topmost part of the building. This continuous flooding brought the fire under control but the building was completely destroyed.

20. Choose the passive sentences :

(a) Huge flames of fire were coming out of each floor.
(b) The building was completely destroyed.
(c) Tall red ladders of the fire engine were stretched upwards.

**Answer options :**

(1) (a) and (b) only
(2) (b) and (c) only
(3) (a) and (c) only
(4) (a), (b) and (c)

21. "Every now and then ... sparks of fire round about."

Identify the structure of the above sentence from the passage.

(1) Simple Sentence
(2) Compound Sentence
(3) Complex Sentence
(4) Compound-Complex Sentence

22. "We could see the fire ... the building."

Rewrite the above statement from the passage as a conditional sentence.

(1) If the police would have allowed us near the building, we could have seen the fire from close.
(2) If the police had allowed us near the building, we could have seen the fire from close.
(3) If we could see the fire from a distance, the police would have allowed us near the building.
(4) If the police would have allowed us near the building, we could see the fire from close.

23. "Huge flames of fire were coming out of each floor".
The exclamatory form of the above sentence is :
(a) What huge flames of fire were coming out of each floor!
(b) How huge the flames were that were coming out of each floor!
(c) What flames of huge fire were coming out of each floor!
(d) How huge flames of fire were coming out of each floor!

**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (a) and (b)
(3) Only (a) and (c) (4) Only (b) and (d)

24. कमी नाभीय अंतर असणाऱ्या दोन बहिर्वक्र भिंगाच्या एकीकरणाने कोणती दर्शी तयार होते ?
(1) साधा सूक्ष्मदर्शी (2) संयुक्त सूक्ष्मदर्शी (3) दूरदर्शी (4) वरील सर्व

25. SI पद्धतीत दाबाचे एकक ________ आहे.
(1) न्यूटन (Newton) (2) पास्कल (Pascal) (3) फॅरड (Farad) (4) हेन्री (Henry)

26. पाणी हे द्रवरूपात आढळते कारण पाण्यामध्ये खालीलपैकी ________ बंध तयार होत असतो.
(1) सहसंयुज बंध (2) आयनिक बंध
(3) हायड्रोजन बंध (4) वरीलपैकी एकही नाही

27. स्टेनलेस स्टीलमधील मुख्य घटक ________ आहेत.
(1) लोखंड, कार्बन व निकेल (2) निकेल व लोखंड
(3) क्रोमिअम, लोखंड, निकेल व कार्बन (4) लोखंड, कार्बन व तांबे

28. HIV व्हायरस चे पूर्ण भाषांतर खालीलपैकी कोणते ?
(1) हारमोन इम्युन व्हायरस (2) ह्युमन इम्युनो डिफीशिअंसी व्हायरस
(3) ह्युमन इम्युनो व्हायरस (4) ह्युमन इंडिगो व्हायरस

29. कोणती चेतासंस्था ही हृदय, फुफ्फुस, जठर इत्यादीसारख्या अनैच्छिक अवयवांतील सर्व चेतांनी बनलेली असते ?
(1) मध्यवर्ती चेता संस्था (2) परिघीय चेता संस्था
(3) स्वायत्त चेता संस्था (4) अस्वायत्त चेता संस्था

30. ________ या विचारवंताच्या मते, आदिवासींच्या विविध वैशिष्ट्यांमुळे आदिवासींना एक आंतरिक मूल्य लाभले आहे.
(1) रिसले (2) इव्हान्स प्रिचर्ड (3) मुजुमदार डी.एन्. (4) घुर्ये जी.एस्.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

31. समाजातील सामाजिक संबंधाच्या स्वरूपाचे ज्ञान आपणास __________ मार्फत होते.

(1) सामाजिक व्यवस्था
(2) सामाजिक परिवर्तन
(3) सामाजिक स्तरीकरण
(4) सामाजिक प्रक्रिया

32. खालीलपैकी कोणता शास्त्रीय निरीक्षणाचा प्रकार नाही ?

(1) संदिग्ध, असंदिग्ध (2) सहभागी, असहभागी (3) नियंत्रित, अनियंत्रित (4) संरचित, असंरचित

33. श्री.पी.ए. सोरोकिन व श्री.सी.सी. झिम्मरमण यांनी आपल्या "प्रिन्सीपल्स ऑफ रूरल अर्बन सोसिऑलॉजी" या ग्रंथात ग्रामीण समाज व शहरी समाज यांतील भेद या घटकांनी केला आहे.

(अ) व्यावसायिक भिन्नता, वातावरणातील भिन्नता
(ब) समुदायाचा आकार, लोकसंख्येचे घनत्व व स्वरूप
(क) सामाजिक विभिन्नता व आंतरक्रिया
(ड) जातीय बंधने

वरीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहेत?

(1) (अ) फक्त (2) (ब) फक्त (3) (ड) फक्त (4) (अ), (ब) आणि (क)

34. हर्बर्ट स्पेन्सरचा "उत्क्रांती" (evolution) सिद्धांत या घटकांना लागू होतो.

(अ) असेंद्रिय घटक (ब) सेंद्रिय घटक (क) धार्मिक घटक (ड) अतिसेंद्रिय घटक

वरील पैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहेत?

(1) (अ) फक्त
(2) (क) फक्त
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) (अ), (ब) आणि (ड)

35. थॉर्नडाइकच्या प्रयत्न प्रमाद अध्ययनाच्या नियमातील अचूक पर्याय ओळखा.

(अ) सज्जतेचा नियम (ब) परिणामाचा नियम (क) अनुशिलनाचा नियम (ड) सरावाचा नियम

**पर्यायी उत्तरे :**

(1) (क) फक्त
(2) (अ), (ब) आणि (क) फक्त
(3) (क) आणि (ड) फक्त
(4) वरीलपैकी सर्व

36. विल्यम वूंटने 1879 मध्ये जर्मनीत मानसशास्त्राची प्रथम प्रयोगशाळा स्थापन केल्यानंतर, कोणते दोन विचारप्रवाह (schools) उदयास आले?

(अ) वर्तनवाद (ब) संरचनावाद (क) मनोविश्लेषणवाद (ड) कार्यवाद

वरीलपैकी कोणता पर्याय **योग्य** आहे?

(1) (अ) आणि (ब) फक्त
(2) (क) आणि (ड) फक्त
(3) (ब) आणि (ड) फक्त
(4) (क) आणि (ब) फक्त

37. परिमाणात्मक परिवर्त्याबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) परिमाणात्मक परिवर्त्यांचे अचूक मापन करता येते.

(ब) मानसशास्त्रीय संशोधनात परिमाणात्मक परिवर्त्यांचा वापर अधिक केला जात नाही.

(क) परिमाणानुसार एका विशिष्ट क्रमाने मांडणी करता येते.

(ड) उंची, वजन, लांबी ही परिमाणात्मक परिवर्त्यांची उदाहरणे आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (क) फक्त (2) (अ) आणि (ड) फक्त

(3) (अ), (क) आणि (ड) फक्त (4) (ब) फक्त

---

38. चेतापारेषक (न्युरोट्रान्समिटर) बाबत काय खरे आहे?

(अ) उत्तेजक स्वरूपाचे कार्य करतात. (ब) वर्तन प्रभावित करतात.

(क) अवरोधक स्वरूपाचे कार्य करतात. (ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) फक्त (2) (अ) आणि (क) फक्त

(3) (ड) फक्त (4) (अ), (ब) आणि (क) फक्त

---

39. नियामक परिवर्तक (Moderating Variable) हा स्वतंत्र परिवर्तकाचाच एक विशेष प्रकार आहे. त्याचे दुसरे नाव ________.

(अ) सक्रिय परिवर्तक (ब) निरंतर परिवर्तक

(क) संबद्ध परिवर्तक (ड) दुय्यम स्वतंत्र परिवर्तक

वरील पैकी कोणता पर्याय **योग्य** आहे?

(1) (अ) फक्त (2) (ब) फक्त

(3) (क) व (ड) फक्त (4) (ड) फक्त

---

40. महाराष्ट्रातील गुंतवणुकदारांना एकत्रित माहिती देणारा, महाराष्ट्र सरकारच्या ऑनलाईन उपक्रमाचे नाव ________ असे आहे.

(1) इ - बिझनेस (2) इ - महाराष्ट्र (3) मैत्री (4) इ - बझ

---

41. संगणक जाळ्यातील सर्व्हर द्वारे ई मेल पाठवणे व स्वीकारणे या कामासाठी खालीलपैकी कोणता प्रोटोकॉल वापरला जातो?

(1) HTTP (2) PHP (3) SMTP (4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**42.** संगणकात वापरले जाणारे 'ॲडोब फोटोशॉप', 'ॲडोब इलस्ट्रेटर', 'पेंट शॉप प्रो' हे सॉफ्टवेअर पॅकेजेस खालीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतात?

(1) वर्ड प्रोसेसर (2) डाटा बेस ॲप्लीकेशन्स

(3) ग्राफिक पॅकेजेस (4) व्हिडिओ गेम

---

**43.** अक्षरे, शब्द, चित्र, आवाज व चलचित्र हाताळू शकणाऱ्या संगणकाला काय संबोधले जाते?

(1) उच्च दर्जाचा संगणक (2) सुपर कॉम्प्यूटर

(3) लॅपटॉप कॉम्प्यूटर (4) मल्टी मेडीया कॉम्प्यूटर

---

**44.** खालीलपैकी कोणते संगणक पॅकेज 'डेटा बेस' पॅकेज प्रकारचे पॅकेज नाही?

(1) ओरॅकल (ORACLE) (2) एक्सेल (EXCEL)

(3) एस.क्यू.एल. (SQL) (4) पेज मेकर (PAGE MAKER)

---

**45.** समर्पक जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | केंद्रीय समाज कल्याण मंडळाची स्थापना | (i) | 1936 |
| (b) | सर दोराबजी टाटा ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्क (TISS) | (ii) | 1828 |
| (c) | सत्यशोधक समाजाची स्थापना | (iii) | 1953 |
| (d) | ब्राम्हो समाजाची स्थापना | (iv) | 1873 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

**46.** इ.स. 1910 मध्ये महर्षी कर्वेंनी __________ या संस्थेची स्थापना केली.

(1) निष्काम कर्ममठ (2) बालिकाश्रम (3) विवाहोत्तेजन मंडळ (4) समता मंच

---

**47.** समाजकार्याचे तत्वज्ञान खालीलपैकी कोणत्या गटातून प्रतिबिंबित होते :

(अ) स्वातंत्र्य, समता, मानवतावाद

(ब) आत्मसन्मान, स्वयंसहाय्यता, व्यावसायिक संबंधांचे गोपनीय स्वरूप

(क) कल्याणकारी राज्य व समाज निर्मिती

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) आणि (ब) (4) (अ), (ब) आणि (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

48. गिरगांव (मुंबई) येथे शारदा सदनाची स्थापना कोणी केली?

(1) सावित्रीबाई फुले
(2) श्रीमती ॲनी बेझंट
(3) पंडिता रमाबाई
(4) महर्षी धोंडो केशव कर्वे

---

49. खालीलपैकी कोणते गैर संभव्यता नमुना निवड पद्धतीचे उपप्रकार आहेत?

(अ) सोयीस्कर नमुना
(ब) साधा यादृच्छिक नमुना
(क) सहेतुक नमुना
(ड) कोटा नमुना

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) आणि (ब)
(2) (अ) आणि (ड)
(3) (अ), (क) आणि (ड)
(4) वरील सर्व

---

50. ''समाजकार्य एक व्यावसायिक सेवा आहे. ज्याचा उपयोग वैयक्तिक आणि सामुदायिक सहाय्य करणे आहे. जेणे करून ते आपल्या विशिष्ट इच्छा व योग्यतेनुसार व सामाजिक इच्छा व योग्यतेनुरूप समाधानकारक जीवन प्राप्त करू शकतील.'' ही व्याख्या कोणी केली?

(1) प्रा. राजाराम शास्त्री
(2) एण्डरसन
(3) फ्रिडलेण्डर
(4) हर्टन आणि लेस्ली

---

51. खालीलपैकी कोणत्या संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश एखादी व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणताही विषय वा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे विवेचन प्रस्तूत करणे आहे.

(1) अन्वेषणात्मक आराखडा
(2) वर्णनात्मक आराखडा
(3) निदानात्मक आराखडा
(4) प्रयोगात्मक आराखडा

---

52. व्यावसायिक समाजकार्याच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे?

(अ) या कार्यात विशिष्ट बंधने, तत्वे व पद्धती बरोबरच नीतिमत्तेचे पालन केले जाते.

(ब) या कार्याचा आधार शास्त्रीय ज्ञान, मानवतावादी दृष्टिकोण व लोकशाही मूल्ये असतात.

(क) दान, श्रमदान व विनावेतन सेवा ही या कार्याची वैशिष्ट्ये होत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
(3) फक्त (क) बरोबर
(4) (अ), (ब) आणि (क) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

53. खालीलपैकी कोणते/ती तत्व/तत्वे समाजकार्यात मूलभूत मानतात?

(a) अशीलाच्या क्षमतावृद्धीसाठी मदत करणे

(b) अशीलाचा स्वीकार करणे

(c) जाणीवपूर्वक संबंध प्रस्थापित करणे

(d) अशीलासंबंधीची माहिती गोपनीय ठेवणे

(e) अशीलाच्या हितासाठी अशीलाच्यावतीने सामाजिक कार्यकर्त्याने निर्णय घेणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (a), (b) आणि (d)

(3) (a), (b), (c) आणि (d) (4) (c) आणि (e)

---

54. समाजकार्य संशोधनाचे हे कार्य नाही.

(1) कार्यक्रमांच्या प्रभावांचे मूल्यांकन करणे

(2) समाजकार्याच्या सिद्धांत, तत्वे, मूल्यांचे परीक्षण करणे

(3) समाजकार्यकर्त्याने व्यवसायाला व्यवहारात आणतांना येणाऱ्या समस्या व अडचणींचा अभ्यास करणे

(4) कार्यक्रम राबविणे

---

55. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा कोणत्या घटनादुरुस्तीन्वये देण्यात आला?

(1) 72 वी (2) 74 वी (3) 77 वी (4) 48 वी

---

56. राज्यघटनेच्या भाग नऊ मध्ये अनुच्छेद '243-ख' खाली, न्यूनतम पातळीवर शासनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हेतूने __________ ची स्थापना करण्यात आली आहे.

(1) नगरपालिका (2) जिल्हा परिषद (3) पंचायत (4) वरीलपैकी काहीही नाही

---

57. भारतीय राज्य घटनेच्या कोणत्या अनुच्छेदानुसार पंचायत राजच्या तरतुदी नागालँड, मेघालय व मिझोराम राज्यांना लागू होत नाही?

(1) अनुच्छेद '243-जे' (2) अनुच्छेद '243-एल'

(3) अनुच्छेद '243-एम (2)' (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

58. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद '243-च (1) क' नुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत मध्ये निवडून येण्यासाठी व्यक्तिचे खालीलपैकी कमीत कमी किती वयोमान असावे लागते?

(1) 18 वर्षे (2) 19 वर्षे (3) 20 वर्षे (4) 21 वर्षे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

59. एकंदर उपलब्ध असलेल्या जागांपैकी प्रत्येक पंचायत निवडणूकांमधे महिलांसाठी किती जागा राखीव असतील?

(1) $\frac{1}{4}$ (2) $\frac{1}{5}$ (3) $\frac{1}{2}$ (4) $\frac{1}{3}$

60. भारतीय राज्यघटना ही खालील तारखेस अंगीकारली गेली ?

(1) 26 जानेवारी 1949 (2) 26 नोव्हेंबर 1949 (3) 15 ऑगस्ट 1947 (4) 15 ऑगस्ट 1950

61. बालकांचा हक्कांबाबत सनद ही संयुक्त राष्ट्र संघाने यावर्षी पारित केली.

(1) 1979 (2) 1989 (3) 1999 (4) 2009

62. बालकांचे अधिकार संरक्षण अधिनियम 2005 अंतर्गत आयोगाचे पुढील अधिकार आहेत.

(अ) बालकांचे अधिकाराबद्दल संशोधनास प्रोत्साहन देणे.

(ब) बालकांचे अधिकार उल्लंघन झाल्यास चौकशी करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) (अ) व (ब) दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

63. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे अध्यक्ष हे असतात.

(1) राष्ट्रपती (2) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश

(3) सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश (4) वरीलपैकी नाही

64. राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम हा यावर्षी पारित करण्यात आला.

(1) 1979 (2) 1990 (3) 2003 (4) 2013

65. मानव अधिकारांचा वैश्विक जाहिरनाम्यात पुढील कलमात जगण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

(1) 14 (2) 3 (3) 21 (4) 9

66. भारताच्या राज्यघटनेतील, राज्याच्या धोरणाचे निर्देशक तत्वांमध्ये महिला व पुरुष या दोघांसाठी ________ नुसार समान कामासाठी समान वेतनाची तरतूद करण्यात आली आहे.

(1) कलम 39 (घ) (2) कलम 38 (3) कलम 37 (4) कलम 36

67. 1979 साली जागतिक पातळीवर महिलांकरिता पुढील महत्वाची तरतूद झालेली आहे :

(1) राज्यघटनेमध्ये कलम 15 चा समावेश

(2) राष्ट्रीय महिला संरक्षण धोरण

(3) महिलांविरुद्धचा सर्व प्रकारच्या भेदभाव वगळणेबाबत अधिसंधी

(4) राष्ट्रीय महिला आयोग स्थापना

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

68. संयुक्त राष्ट्राचा महासभेने मानव अधिकारांचा वैश्विक जाहिरनामा हा पुढील तारखेस घोषित केला.

(1) 10 डिसेंबर 1948 (2) 24 डिसेंबर 1945 (3) 26 नोव्हेंबर 1949 (4) 26 जानेवारी 1950

---

69. 2017-18 पासून 2019-20 या तीन टप्प्यात राबविल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पोषण मिशनसाठी किती निधीची तरतूद केली आहे? (केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी)

(1) ₹ 500 कोटी (2) ₹ 1500 कोटी (3) ₹ 3015.15 कोटी (4) ₹ 9046.17 कोटी

---

70. केंद्रीय क्षेत्र योजना म्हणून सुरु केलेल्या 'स्टेप' (STEP) योजनेसंबंधी खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे?

(अ) महिलांना रोजगारक्षम बनविण्यासाठी कुशलता उपलब्ध करण्याची तरतूद.

(ब) स्वयं रोजगार किंवा उद्योजकतेची क्षमता व कौशल्य उपलब्ध करणे.

(क) 16 वर्षे व अधिक वयाच्या महिलांमध्ये रत्ने, जवाहिरे, पर्यटन, आदरातिथ्य इ. कौशल्ये विकसित करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (अ) आणि (ब) (4) वरील सर्व

---

71. महिला आणि बाल विकास मंत्रालयाशी संलग्न संस्था (स्वायत्त) कोणती?

(अ) राष्ट्रीय जनसहयोग व बाल विकास संस्था (NIPCCD)

(ब) राष्ट्रीय महिला कोष (RMK)

(क) केंद्रीय समाज कल्याण मंडळ (CSWB)

(ड) केंद्रीय दत्तक साधन प्राधिकरण (CARA)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) फक्त (क) (4) वरील सर्व

---

72. घटनेच्या 1992 साली पारित केलेल्या __________ घटना दुरुस्तीनुसार स्त्रियांना पंचायत राज्य संस्थात व शहरी स्थानिक संस्थात 33 टक्के आरक्षण दिलेले आहे.

(1) 71 व्या व 72 व्या (2) 73 व्या व 74 व्या (3) 75 व्या व 76 व्या (4) 77 व्या व 78 व्या

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

73. गर्भवती महिला आणि स्तनदा मातांसाठी मा. पंतप्रधानांनी घोषित केलेल्या प्रधानमंत्री मातृ वंदना योजना संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **अचूक** आहे?

(अ) 1 जानेवारी, 2017 पासून योजना अंमलात आली.

(ब) एकात्मिक बाल विकास सेवा/आरोग्य यंत्रणा द्वारे ही योजना राबविली जाते.

(क) या योजनेद्वारा पात्र लाभार्थी महिलेस ₹ 5000 तीन हप्त्यात दिले जातात.

(ड) जुन्या आय.जी.एम.एस.वाय. अंतर्गत पहिला हप्ता मिळालेल्या लाभार्थीस फक्त तिसरा हप्ता मिळेल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब) (2) (अ) आणि (क)
(3) फक्त (क) (4) वरील सर्व

---

74. संयुक्त राष्ट्रसंघाने ________ साल हे "आंतरराष्ट्रीय महिला वर्ष" म्हणून जाहीर केले.

(1) 1970 (2) 1972 (3) 1975 (4) 1990

---

75. कामगार महिलांकरिता निवासाची सोय व्यवस्था प्रथम ________ शहरातील कामगार महिलांकरिता करण्यात आली.

(1) मुंबई (2) दिल्ली (3) कोलकाता (4) मद्रास

---

76. संयुक्त राष्ट्र संघटनेने सन ________ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय बालिका वर्ष" म्हणून जाहीर केले होते.

(1) 1990 (2) 1970 (3) 1991 (4) 1975

---

77. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 नुसार माहिती अधिकाऱ्याने मागितलेली माहिती ही पुढील वेळेत दिली पाहिजे :

(1) 15 दिवसात (2) 30 दिवसात (3) 60 दिवसात (4) वेळेची तरतूद नाही

---

78. कोणत्या आंतरराष्ट्रीय कराराचे महिलांच्या हक्कांच्या संरक्षणासंदर्भ अनन्यसाधारण महत्व आहे?

(1) मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, 1948

(2) संयुक्त राष्ट्रसंघाचा विकासाच्या हक्कांचा जाहीरनामा, 1986

(3) स्त्रियांविरुद्ध होणारे सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करण्याचा करार, 1979

(4) वरीलपैकी नाही

---

79. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 मधील कोणत्या कलमानुसार शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या कायदेशीर कामाच्या मोबदल्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिकडून स्वत:साठी किंवा इतर व्यक्तिसाठी कामाच्या मोबदल्यात बक्षिसी स्वीकारल्यास किंवा स्वीकारण्यासाठी राजी असल्यास किंवा स्वीकारण्याचा प्रयत्न केल्यास तो गुन्हा ठरविण्यात आला आहे?

(1) कलम 4 (2) कलम 6 (3) कलम 7 (4) कलम 24

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

80. अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, 1956 च्या कलम 4 नुसार कोणीही 18 वर्षे पूर्ण झालेली व्यक्ती अन्य कोणत्याही व्यक्तिच्या वेश्याव्यवसायाच्या उत्पन्नावर जगत असल्यास व असे उत्पन्न अज्ञानाच्या वेश्याव्यवसायातून मिळवित असल्यास खालीलपैकी किती वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे?

(1) 2 ते 5 वर्ष (2) 7 ते 10 वर्ष
(3) जन्मठेप (4) वरीलपैकी काहीही नाही

81. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, 2005 नुसार संरक्षण आदेशाचे उल्लंघन केल्यास पुढील शिक्षेची तरतूद आहे :

(1) एक वर्ष कैद अथवा दंड अथवा दोन्ही (2) पाच वर्ष कैद अथवा दंड
(3) सहा महिने कैद (4) केवळ दंड

82. संविधानाच्या कलम _________ अन्वये धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरुन भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली आहे, व त्याच बरोबर स्त्रिया व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही अशी देखील सोय आहे.

(1) 14 (2) 15 (3) 16 (4) 17

83. वैद्यकीय गर्भपात अधिनियम, 1971 (MTP Act) च्या अंतर्गत गर्भपात करण्यासाठी दोन प्रमाणित (Registered) डॉक्टरांच्या मताची गरज केव्हा असते?

(1) गर्भ 8 आठवडे ते 20 आठवडे पर्यंत असताना.
(2) जेव्हा गर्भाचे वय 12 आठवड्यापेक्षा जास्त पण 20 आठवड्यापर्यंत असते तेव्हा.
(3) गर्भ 20 आठवड्याहून जास्त मोठा असतो.
(4) कोणत्याही परिस्थितित 2 डॉक्टरांची गरज असतेच.

84. लिंग निदान प्रतिबंधक अधिनियम, गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम, 1994 नुसार गुन्हा घडल्यास व गुन्ह्याकरिता विशिष्ट शिक्षेची तरतूद नसल्यास त्यास पुढील शिक्षा होईल :

(1) जन्मठेप (2) फाशी
(3) तीन महिने कैद अथवा दंड अथवा दोन्ही (4) वरीलपैकी नाही

85. खालीलपैकी कोणत्या पदार्थात न पचणारे पॉलिसॅकराईडस् मिळतात?

(1) मांस व मासे (2) साखर व गूळ (3) फळे (4) बटाटा

86. जागतिक संघटनेने 2004 साली आरोग्य दिनादिवशी दिलेले घोष वाक्य :

(1) "आपले आरोग्य आपल्या हाती" (2) "आपले हात आपले आरोग्य"
(3) "आरोग्य आपल्या दैनंदिन आहारात" (4) "आरोग्य आपले हात आपले"

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**87.** आवश्यक अमाईनो ॲसिड (आम्ल) हे संबोधन खालीलपैकी कोणत्या अमाईनो आम्लाला दिले जाते ?

(1) जे निसर्गात विपुलतेने मिळतात

(2) जे आहारात समाविष्ट असतात

(3) जे शरीरात फारसे कार्य करत नाहीत

(4) जे शरीराच्या विकास व वाढीसाठी फारच महत्वाचे असतात

---

**88.** अंगुलर स्टोमॅटिटिस (Angular stomatitis) हे कोणत्या पोषक तत्वाच्या अभावाचे लक्षण आहे ?

(1) प्रथिने (2) आयोडीन (3) विटामिन ब (4) लोह

---

**89.** स्वादुपिंडात कोणत्या संप्रेरकांची (Harmones) निर्मिती होते ?

(1) थायरॉक्झीन्

(2) इन्सुलीन व ग्लुकॅगॉन

(3) इस्ट्रोजेन व ऑक्सिटोसिन

(4) प्रोजेस्ट्रॉन व थायरॉक्झीन्

---

**90.** हायड्रोजनेशन या प्रक्रियेमुळे स्निग्धांमध्ये कोणत्या घटकांचे प्रमाण वाढते ?

(1) ओमेगा फॅटी ॲसिड्स

(2) ट्रान्स फॅटी ॲसिड्स

(3) मोनो अन्सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड्स

(4) ग्लिसराईड्स

---

**91.** लिंग निदान चाचणी करून लिंग निवडण्यास बंदी, आणि आनुवंशिक विकृती शोधण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान तंत्रांचा वापर विनियमीत करण्यासाठी पारित केलेल्या पी.एन.डी.टी. ॲक्ट (1994) अनुसार खालीलपैकी कोणती तरतूद केली आहे ?

(अ) प्रसूतीपूर्व लिंग निदानासंबंधी जाहिरात करण्यास मनाई

(ब) पी.एन.डी.टी. ॲक्ट मधील तरतुदींचे उल्लंघन करून वैद्यकीय व्यावसायिक/तांत्रिक सेवा पुरविण्यास मनाई

(क) सदर कायद्यातील तरतुदींचा भंग करणाऱ्या कंपनीच्या प्रत्येक जबाबदार व्यक्तिस – संमती देणे, कट करणे, दुर्लक्ष करणे यासाठी खटल्यास सामोरे जावे लागेल

(ड) स्वेच्छेने लिंग निदान चाचणी करून घेणाऱ्या स्त्रीला उप-कलम 23 (3) लागू होत नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)

(2) फक्त (ब)

(3) (अ), (ब) आणि (क)

(4) फक्त (ड)

---

**92.** बालपक्षाघात (पोलिओ) हा कोणत्या संसर्गामुळे होणारा रोग आहे ?

(1) जीवाणू (2) विषाणू (3) किटाणू (4) हेपटोसाइट

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

93. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

(अ) बाल्यावस्था संपण्यापासून पौगंडावस्थेतील चार वर्षापर्यंत घडून येणारे बदल आकार आणि प्रमाणशीरतेत दिसतात.

(ब) पौगंडावस्थेत प्राथमिक आणि दुय्यम लैंगिक लक्षणांचा विकास होतो.

(क) पौगंडावस्थेच्या बदलामुळे वर्तन बदल आणि लिंग-योग्यता व सामान्यपणाची काळजी निर्माण होते.

(ड) पौगंडावस्थेतील बदलाचे प्रभाव सामाजिक समायोजन व वर्तनावर दिसत नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
(3) फक्त (अ), (ब) आणि (क) बरोबर
(4) फक्त (अ) आणि (ड) बरोबर

---

94. पूर्व बाल्यावस्थेतील सामाजिक स्थितीतील सामाजिक वर्तन प्रकार खालील कोणत्या गटातून व्यक्त होतात?

(अ) सहकार्य, ईर्षा, उदारता, सामाजिक मान्यतेची आकांक्षा, दुसऱ्यावरील अवलंबीत्व, सुस्विकृत व्यक्तीचे अनुकरण

(ब) नकारात्मकता, आक्रमकता, बोलीतून वर्चस्व, लिंग विरोध

(क) अतीसंवेदनशिलता, स्पर्धा, खिळाडूवृत्ती, जबाबदारी स्विकारण्याची तयारी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब)
(3) फक्त (क)
(4) (अ) आणि (ब)

---

95. विशेष पोषण आहार कार्यक्रमाचा __________ पंचवार्षिक योजनाकाळात प्रारंभ करण्यात आला.

(1) तिसऱ्या
(2) चौथ्या
(3) पाचव्या
(4) सहाव्या

---

96. व्यक्तिश: मनुष्य जीवनाचा प्रारंभ यापासून होत असतो :

(1) फलित रजोरेणूपासून
(2) रज: कोष पासून
(3) रनारेणूपासून
(4) रजोवाहिनी पासून

---

97. कुपोषणाचा बालकावरील प्रभाव कोणता?

(अ) शरीर बांधणी (एन्डोमॉर्फिक/एक्टोमॉर्फिक)

(ब) अनेक प्रकारची रोग प्रवणता

(क) चिडचिडेपणा, तणावग्रस्त खिन्न व्यक्तित्व

(ड) आक्रमकता, भांडखोरपणा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (अ) आणि (ब)
(3) फक्त (अ), (ब) आणि (क)
(4) फक्त (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**98.** खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

(अ) प्रसूतीपूर्व विकासाचा पहिला टप्पा फलित बीज रजोगोल (Ovum) काळात गर्भधारणेपासून 2 आठवडे त्याच्या आकारात बदल होत नाही.

(ब) भ्रूणावस्था काळात दुसऱ्या महिन्याच्या शेवटापर्यंत सर्व महत्वाचे अंतर्गत व बाह्य विशेष विकसित होऊ लागतात. यावेळी भ्रूणाचे लिंग ओळखता येते.

(क) दुसऱ्या महिन्याच्या अंतापासून प्रसूतीपर्यंतच्या भ्रूण काळातील पाचव्या महिन्यापर्यंत अंतर्गत अवयव विकसित होतात व मज्जापेशींचा जलद विकास होतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) बरोबर
(2) फक्त (ब) बरोबर
(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर
(4) फक्त (क) बरोबर

---

**99.** भाषेचा विकास, बोलण्याचे कौशल्य शिकण्यातून होते हे एक हालचाल-मानसिक कौशल्य असते. बालकाच्या भाषेच्या विकासात कोणत्या पद्धती उपयोगी ठरतात?

(अ) प्रयत्न करा आणि चुका (Trial and Error)
(ब) अनुकरण (Imitation)
(क) प्रशिक्षण (Training)
(ड) द्वैभाषिकता (Bilingualism)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (ब) आणि (क)
(3) (अ), (ब) आणि (क)
(4) फक्त (ड)

---

**100.** विशिष्ट उद्दिपकांच्या उपस्थितीत ज्या प्रतिक्रिया आपोआप दिल्या जातात आणि ज्या अनैच्छिक अनधित आणि तरीही संघटित असतात त्यांना काय म्हणतात ?

(1) सचिवेदन
(2) प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया
(3) बहुलक संवेदन
(4) बोधनिक प्रतिक्रिया

---

- o O o -

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL